## लक्षवेधी

### रामेश्वरम कॅफे ब्लास्ट: दोन्ही मुख्य आरोपींना अटक

**गोवन वार्ता । बेंगळुरू :** बेंगळुरूच्या रामेश्वरम कॅफे बॉम्बस्फोट प्रकरणात तपास यंत्रणा एनआयएला मोठे यश मिळाले आहे. बॉम्बस्फोट प्रकरणातील दोन आरोपींना पश्चिम बंगालमधून अटक करण्यात आली आहे. एनआयएने या दोन आरोपींवर प्रत्येकी १० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. एनआयएने या प्रकरणी फरारी अदबुल मतीन ताहा आणि मुसावीर हुसेन शाजेब यांना कोलकाता जवळून अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार एनआयएने गुप्त माहितीच्या आधारे दोन्ही आरोपींना अटक केली. मुसावीर हुसैन शाजिब असे मुख्य आरोपीचे नाव असून त्यानेच कॅफेमध्ये आयईडी पेरला होता. अब्दुल मतीन ताहा याने त्याला मदत केली होती. शाजिब आणि ताहा हे दोघेही कर्नाटकातील शिवमोग्गास्थित आयसिस मॉड्यूलचे सदस्य होते अशीही माहिती यावेळी एनआयएने दिली. बनावट ओळखपत्र आणि इतर गोष्टींच्या आधारे दोन्ही आरोपी कोलकात्याजवळ लपून बसल्याचे सांगण्यात येत आहे. गुप्त माहितीच्या आधारे एनआयएने दोघांचे ठिकाण शोधून त्यांना ताब्यात घेतले आहे.

### मायावतींच्या बसपाने घोषवाक्य बदलले

**गोवन वार्ता। लखनौ:** लोकसभेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मायावतींच्या बहुजन समाज पक्षाने (बसप) पक्षाने हक्काच्या मूळ मतदारांवर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी पक्षाचे घोषवाक्य असलेल्या 'सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय' मध्ये बदल करून ते 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' असे करण्यात आले आहे. 'बसप' ने २००७ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये सोशल इंजिनिअरिंगचा आधार घेत सत्ता मिळविली होती.

## दिल्ली मद्य धोरण प्रकरणी राऊस ॲव्हेन्यू न्यायालयाचा निर्णय

# के. कविता यांची १५ पर्यंत सीबीआय कोठडीत रवानगी

न्यूज डेस्क। गोवन वार्ता

**नवी दिल्ली :** दिल्ली मद्य धोरण प्रकरणाशी संबंधित भ्रष्टाचार प्रकरणात माजी मुख्यमंत्री केसीआर यांची कन्या के. कवितांना दिल्लीच्या राऊस ॲव्हेन्यू न्यायालयाने १५ एप्रिलपर्यंत सीबीआय कोठडी सुनावली आहे. सीबीआयने कवितांची चौकशी करण्यासाठी पाच दिवसांची कोठडी मागितली होती.

सीबीआयचे म्हणणे आहे की, मद्य धोरणाशी संबंधित षडयंत्राचा पर्दाफाश करण्यासाठी पुराव्यांसह कवितांना सामोरे जाण्याची गरज आहे. 'आप'ला लाच देण्याबाबत त्यांनी समाधानकारक उत्तर दिले नाही. मात्र, कविता यांच्या वकिलाने सीबीआयची ही कारवाई बेकायदेशीर असल्याचे म्हटले आहे. त्यांनी तपास यंत्रणेवर मूलभूत अधिकारांचे उल्लंघन केल्याचा आरोप केला आहे. एजन्सीने गुरुवारी कवितांना तिहार तुरुंगातून अटक केली होती.



के. कविता यांना राऊस ॲव्हेन्यू न्यायालयात आणताना.

कविता या तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या कन्या आहेत. ईडीने त्यांना १५ मार्च रोजी हैदराबादच्या बंजारा हिल्स येथील घरातून अटक केली होती. १६ मार्च रोजी राऊस ॲव्हेन्यू न्यायालयाने त्यांना २३ मार्चपर्यंत ईडी कोठडीत पाठवले.

### सीबीआयकडून विविध गुन्ह्यांखाली अटक

मनी लाँड्रिंग प्रकरणात कविता २६ मार्चपासून न्यायालयीन कोठडीत होत्या. रिमांड मिळाल्यानंतर कवितांना सीबीआय मुख्यालयात नेले जाईल. तिथे त्यांची चौकशी केली जाईल. यापूर्वी सीबीआयने ६ एप्रिलला न्यायालयाच्या परवानगीने तिहारला जाऊन कवितांची चौकशी केली होती. सीबीआयने कवितांना गुन्हेगारी कट, खाते खोटे करणे आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याखाली अटक केली आहे.

## पुणे जिल्ह्यात ६५ लाख रोकड, वाहन जप्त

न्यूज डेस्क । गोवन वार्ता

**पुणे :** लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुण्यात पोलीस पथक आणि भरारी पथकांद्वारे दोन विविध घटनांमध्ये सुमारे ६५ लाखांची रोकड आणि एक वाहन ताब्यात घेण्यात आले आहे.

आचारसंहिता काळात ५० हजार रुपयांपेक्षा जास्त रोख रक्कम जवळ बाळगता येत नाही. भरारी पथकांतर्फे विविध ठिकाणी जिल्ह्यात येणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात येत आहे. भोसरी एमआयडीसी पोलिसांनी भोसरी एममआयडीसी पोलीस स्टेशन जवळील सी सर्कल जवळ ८ एप्रिल रोजी मध्यरात्री काळ्या रंगाच्या फॉरच्यूनर गाडीत १३ लाख ९० हजाराच्या ५०० रुपयांच्या नोटा आढळून आल्या होत्या.

तर दुसऱ्या एका घटनेत १० एप्रिल रोजी दुपारी शिरुर पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांना शिरुर नगर परिषद क्षेत्रातील कमान पूलाजवळ एका खासगी वाहनातून ५१ लाख १६ हजाराची रक्कम नेली जात असल्याचे पाहणीत आढळून आले.

# इराणची इस्त्रायलवर हल्ल्याची धमकी

- रशिया-जर्मनीने दिला संयम बाळगण्याचा सल्ला

न्यूज डेस्क । गोवन वार्ता



**तेल अविव :** इस्त्रायल आणि इराणमधील युद्धाच्या वाढत्या धोक्यांदरम्यान रशिया आणि जर्मनीने मध्यपूर्वेतील देशांना संयम बाळगण्याचे आवाहन केले आहे. इस्त्राईलवर हल्ला करण्याच्या इराणच्या धमकीमुळे संपूर्ण मध्यपूर्वेतील शांततेला धोका निर्माण झाला आहे.

दरम्यान, जर्मनीच्या लुफ्थांसा एअरलाइन्सने संघर्षाचा धोका लक्षात घेऊन तेहरानला जाणारी त्यांची उड्डाणे स्थगित केली आहेत. रशियानेही मध्यपूर्वेला प्रवास न करण्याचा इशारा दिला आहे. इराणने १ एप्रिल रोजी दमास्कसमधील आपल्या दूतावास संकुलावर झालेल्या हवाई हल्ल्याचा बदला घेण्याचा चंग बांधला आहे.

या हल्ल्यात एक इराणी जनरल आणि इतर सहा इराणी लष्करी अधिकारी मारले गेले होते. गाझा युद्धामुळे आधीच तणावाखाली असलेल्या प्रदेशात यामुळे तणाव वाढला आहे. इस्त्रायलने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली नसली तरी इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खमेनी यांनी बुधवारी सांगितले की, इस्त्रायलचा हा हल्ला इराणच्या सार्वभौमत्वास धक्का आहे. त्यामुळे शिक्षा मिळायलाच हवी."इराणची संयुक्त राष्ट्रसंघाच्या सभेत टिप्पणी

संयुक्त राष्ट्रसंघातील तेहरानच्या मिशनने गुरुवारी सांगितले की इस्त्रायलला शिक्षा करणे इराणसाठी अत्यावश्यक आहे. जर संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने या हल्ल्याचा निषेध केला असता आणि दोषींवर कारवाई केली असती तर अनेक गोष्टी टाळता आले असते. यावर इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू म्हणाले की, इस्त्रायल गाझामध्ये आपले युद्ध सुरू ठेवत आहे. परंतु इतर ठिकाणी देखील सुरक्षेच्या दृष्टीने तयारी करत आहे.

# खुद्द बाबासाहेब आले तरी संविधान संपवू शकत नाहीत

## मोदींचे विरोधकांना उत्तर : राजस्थानातील बारमर येथे प्रचार सभा

न्यूज डेस्क । गोवन वार्ता

**नवी दिल्ली :** खुद्द बाबासाहेब जरी आले तरी ते संविधान संपवू शकत नाहीत, असे विधान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. राजस्थानातील बारमर इथल्या प्रचार सभेत बोलताना त्यांनी काँग्रेससह इंडिया आघाडीवर सडकून टीका केली. तसेच त्यांनी बाबासाहेब आणि संविधानाचा अपमान केला असा आरोपही केला.

मोदी म्हणाले, एससी, एसटी आणि ओबीसींसोबत अनेक दशकांपासून भेदभाव करणारा काँग्रेस पक्ष आजकल एक जुनी रेकॉर्ड वाजवत आहे. जेव्हा पण निवडणूक येते त्यानंतर संविधा-



नावरून खोटे बोलणे ही इंडिया आघाडीची फॅशन झाली आहे. ती काँग्रेस जिने बाबासाहेब हयात असताना त्यांना निवडणुकीत हरवले. ज्यांनी बाबासाहेबांना भारतरत्न मिळू दिला नाही. त्या काँग्रेसने देशात आणिबाणी लागू करून संविधान संपवण्याचा प्रयत्न केला आज तिच काँग्रेस मोदीला शिव्या देण्यासाठी संविधानाच्या आडून खोटे बोलत आहे. हे ते मोदी आहेत ज्यांनी देशात पहिल्यांदा संविधान दिन साजरा करणे सुरू केले. पण याला काँग्रेसवाल्यांनी विरोध केला होता. हा बाबासाहेबांचा आणि संविधानाचा अपमान आहे की नाही.

इतकेच नाही हे मोदी आहेत ज्यांनी बाबासाहेबांशी संबंधित पंचतीर्थांचा विकास केला. त्यामुळे बाबासाहेबांचा आणि संविधानाचा अपमान करणाऱ्या काँग्रेस आणि इंडिया आघाडीच्या खोटारडेपणामुळे सावध राहण्याची गरज आहे. काँग्रेसने हे लक्षात ठेवावे की हे ४०० जागांचे ध्येय जनतेने यासाठी ठेवले आहे की, तुम्ही १० वर्षे मला चांगले काम करण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे देश तुम्हाला शिक्षा देणार.

# पुन्हा होऊ शकतो 'पेगॅसस'सदृश स्पायवेअरचा हल्ला : ॲपल

## ९२ देशांतील आयफोन धारकांना दिला सतर्कतेचा इशारा

न्यूज डेस्क । गोवन वार्ता

**वॉशिंग्टन :** नुकतेच ॲपलने जगभरातील तब्बल ९२ देशांतील वापरकर्त्यांसाठी एक मोठा अलर्ट जारी केला आहे. यामध्ये आयफोनवर पेगॅसस सारख्या स्पायवेअरच्या संभावित हल्ल्याची शक्यता वर्तवली आहे. तसेच यामुळे तुमचे बँक अकाऊंट देखील खाली होऊ शकते.

ॲपलने आयफोन वापरकर्त्यांना यासंदर्भात ११ एप्रिल रोजी दुपारी १२.३० वाजता ईमेलही पाठवला आहे. ॲपलने म्हटले की मर्सिनरी स्पायवेअरसारखे हल्ले फारच दुर्मिळ आहेत. कारण अशा हल्ल्यांना लाखो डॉलर्सचा खर्च येतो. असे हल्ले ठराविक लोकांवरच केले जातात. तरीही ॲपलने आपल्या आयफोन वापरकर्त्यांना अत्यंत सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला आहे आणि अनोळखी लोकांकडून मिळालेल्या लिंक्स आणि ॲटेचमेंटवर क्लिक न करण्याचा इशारा दिला आहे. रिपोर्टनुसार, ॲपलला आयफोन्समध्ये 'पेगॅसस'सदृश्य स्पायवेअरचे अंश सापडले आहेत. या प्रकारच्या स्पायवेअरद्वारे हॅकर्स स्मार्टफोन वापरकर्त्यांची वैयक्तिक माहिती मिळवतात.

# निवडणुकीच्या प्रचारासाठी जामीन द्या : सिसोदिया

न्यूज डेस्क । गोवन वार्ता

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीचा प्रचार करण्यासाठी हंगामी जामीन दिला जावा, अशा विनंतीची याचिका दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांनी विशेष न्यायालयात दाखल केली आहे. दरम्यान, याचिकेची दखल घेत न्यायालयाने सीबीआय आणि ईडीला नोटीस बजावत उत्तर सादर करण्यास सांगितले आहे.

मद्य धोरण बनविताना मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करण्यात आला होता. ठराविक लोकांना लाभ मिळावा, यासाठी धोरणात त्रुटी ठेवण्यात आल्या होत्या. शिवाय मद्य विक्रीचे परवाना शुल्क माफ करण्यात आले होते अथवा ते कमी करण्यात आले होते, असा आरोप तपास संस्थांकडून न्यायालयात करण्यात आला आहे.



गैरव्यवहारात सामील असल्याचा आरोप करीत सीबीआयने फेब्रुवारी २०२३ मध्ये सिसोदिया यांना अटक केली होती. यानंतर २८ फेब्रुवारी २०२३ रोजी सिसोदिया यांनी उपमुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. सीबीआयनंतर ईडीने सिसोदिया यांना अटक करत त्यांची चौकशी केली होती. सिसोदिया यांच्या याचिकेची दखल घेत विशेष न्यायालयाच्या न्यायाधीश कावेरी बावेजा यांनी ईडी आणि सीबीआयला नोटीस बजावली आहे. नोटिशीवर २० तारखेपर्यंत उत्तर देण्यास सांगण्यात आले आहे.

**CHANGE IN NAME**

I, MANUELINA GALDINO, R/o H.No 101, Gunebhat, Bamonsai, Sanguem, South Goa, Goa 403704 would like to change my name from MANELINA GALDINO to MANUELINA GALDINO. Henceforth I will be known as MANUELINA GALDINO in all my document, proceedings and dealings.

BOSS - 9822100065

**CHANGE OF NAME**

I, Mrs. MIGUELINHA FERNANDES, wife of MILAGRES FERNANDES residing at H. NO. 400, VITOLEM SARZORA CHINCHINIM, SOUTH GOA-403715 INDIA, has changed my name from MARY FERNANDES to MIGUELINHA FERNANDES. Hereafter, in all my dealings & documents, I will be known by the name MIGUELINHA FERNANDES.

Sd/- MIGUELINHA FERNANDES

**CHANGE IN NAME**

I, LIFA SIMOES Indian National, R/O H.No. 193, Kevona, Colamba, Sanguem, South Goa, 403705 would like to change my name on passport bearing No. K4579392 from LIFA BOSTAO SIMOES to LIFA SIMOES as per my Birth Certificate, Aadhaar Card and other documents. Hereafter in all future dealings and documents I shall be known as LIFA SIMOES

Sd/- LIFA SIMOES

**IN THE COURT OF MAMLATDAR OF BARDEZ TALUKA AT MAPUSA-GOA.**

Case No. MAM/MND/NEG-DEC/Revora/11/2024

1. Miss Sharmila Veloso alias Sharmila Francisca Maria Jose Salvacao Veloso or Sharmila Francisca Veloso or Sharmila Aleixo Veloso, 2. Mrs. Vinita Francisca Amelia De Sousa-Veloso alias Vinita De Souza or Vinita Francisca Veloso or Vinita Veloso Elvino De Souza or Vinita Francisca Amelia Veloso, 3. Mr. Bernardo Felipe Savio Elvino De Sousa alias Bernardo E. De Souza, All resident of 205, Badem, Salvador-do-Mundo, Bardez-Goa. ...Applicants

V/s

Smt. Terezin D'Souza, r/o. Kairad vaddo, Revora, Bardez-Goa ...Opponent

**PUBLIC NOTICE**

To, The Opponent,

**Whereas**, the applicant above named has made an application dated 21/03/2024 for negative declaration u/s. 8A of the Goa, Daman & Diu Mundkars (Protection from Eviction) Act, 1975, with regards to the property surveyed under Sy. No. 171/1 situated at Revora, Bardez Goa in this court against you.

**And whereas** the applicant vide his application filed on 06/04/2024 has submitted that the some of the notices issued to the above opponent returned unserved and has therefore prayed for publication of notice by way of substitute service.

**And whereas** in my opinion this is fit case for publication under order V Rules 29(1)(A) of C.P.C. 1908 to publish the notice through local newspaper for vide publicity.

Now therefore, in terms of provision of the order V Rule 29(1) (A) for C.P.C. 1908, the above opponents are hereby called upon to appear in this court **on 26/04/2024 at 11:00 a.m.,** to answer the claim of the applicant.

Take notice that in default of your appearance as aforesaid on the above said date and time, the said application will be heard and determined in your absence.

Given under by hand and the seal of this court, on this 10th day of April, 2024.

Seal

Sd/-

(Prataprao Gaunker)

Mamlatdar of Bardez Mapusa - Goa.

**स्टेट बँक ऑफ इंडिया**

एसएआरबी ठाणे (11697):- पहिला मजला, केरोम प्लॉट क्र. 112, सर्कल, रोड क्र 22 वागळे इंडस्ट्रिअल इस्टेट, ठाणे (पश्चिम) - 400 604
शाखेचा ईमेल आयडी: sbi.11697@sbi.co.in लँडलाइन क्र. (कार्यालय) :- 022-25806863

**अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 8(6) साठी प्रोव्हिसो सह वाचण्यात येणाऱ्या सेक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियली असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

या सूचनेंतर्ग सर्वसामान्य जनतेला, विशेषत: कर्जदार/ हमीदारांना असे कळविण्यात येते की खाली वर्णन केलेली सुरक्षित धनकोकडे गहाण / तारण ठेवलेल्या अचल मालमत्ता, ज्याचा स्टेट बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी यांनी **प्रतिकात्मक ताबा** घेतलेला आहे आणि कर्जदार आणि हमीदारांनी सुरक्षित धनकोकडून घेतलेल्या कर्जामुळे **"जसे आहे जेथे," "जे आहे ते"** आणि **"जे काही आहे ते"** या आधारावर **दि. 15.05.2024** रोजी या मालमत्तेची विक्री केली जाईल.

| मालमत्ता सिरियल क्र. | अधिकृत अधिकाऱ्याचे नाव | संपर्क क्र. |
|---|---|---|
| 1 | चंद्रकुमार डी कांबळे | 7875551566 |

| कर्जदारांचे नाव | थकीत रक्कम ज्याच्या पुनर्प्राप्तीसाठी मालमत्तांची विक्री केली जात आहे |
|---|---|
| 1. श्री तुकाराम गुरुदास मळगावकर<br>2. श्री निलेश गुरुदास मळगावकर<br>3. श्रीमती सीता तुकाराम मळगावकर<br>4. श्रीमती नेहा नीलेश मळगावकर<br>5. श्रीमती सरिता गुरुदास मळगावकर | **रु. 2,58,59,558/-** (रुपये दोन कोटी अठ्ठावन्न लाख एकोणसाठ हजार पाचशे अठ्ठावन्न फक्त) 29.05.2023 प्रमाणे<br>**मागणी सूचना तारीख : 29.05.2023** |

**मालमत्ता क्र. 1:** प्लॉट क्र. डी-1 ची ती सर्व मालमत्ता, मोजमाप क्षेत्र 1075 चौ. मी. सोबत त्यावर असलेले निवासी घर, मोजमाप 258.27 एम2 "ओईटेरियो रेडोर दे अवलगेल" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेचा विभक्त आणि विलग केलेला भाग (लॉट आरक्षित क्र.173), चलता क्र.3, म्हापसा सिटी सर्व्हेचे पी टी शीट क्र.45, मालमत्तेची ना भू-नोंदणी कार्यालयात नोंद आहे ना आल्तिनो येथील तालुका महसूल कार्यालयात नोंद आहे, म्हापसा नगरपालिकेच्या अधिकारक्षेत्रात, तालुका आणि नोंदणी उपजिल्हा बार्देश, उत्तर गोवा जिल्हा, गोवा जिल्ह्यातील, गोवा राज्यात.

**राखीव किंमत: रु.4,08,80,000/-,** **ईएमडी रु. 40,88,000**

**ताबा स्थिती: प्रतिकात्मक (डीएम ऑर्डर प्राप्त)**

**अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी) = राखीव किमतीच्या 10%**

**बोली वाढीची रक्कम = रु. 1,00,000**

सहभागाचे विनंती पत्र/ केवायसी कागदपत्रे/ ईएमडीचा पुरावा इ. सादर करण्याची तारीख आणि वेळ = 14.05.2024 रोजी संध्याकाळी 5.00 पर्यंत किंवा त्यापूर्वी.

ई-लिलावाची तारीख आणि वेळ = तारीख:- 15.05.2024 वेळ:- दुपारी 1 ते 3 यावेळेत प्रत्येकी 10 मिनिटांच्या अमर्याद विस्तारांसह

मालमत्तांच्या तपासणीची तारीख आणि वेळ: 10.05.2024 सकाळी 11 ते दुपारी 1 पर्यंत.

**संपर्क = श्री. चंद्रकुमार डी. कांबळे: ( मो.क्र. 7875551566 ) आणि**
**श्री. अवधूत लेले : ( मो.क्र. 9970894972 )**

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी, कृपया स्टेट बँक ऑफ इंडिया, सिक्युर्ड क्रेडिटरच्या वेबसाइट्स:

1. https://www.mstcecommerce.com/auctionhome/ibapi/index.jsp
2. http://www.sbi.co.in मध्ये प्रदान केलेल्या लिंकचा संदर्भ घ्या.

सही/-

**चंद्रकुमार डी कांबळे, अधिकृत अधिकारी**
**स्टेट बँक ऑफ इंडिया**

**तारीख : 13.04.2024** **ठिकाण : ठाणे**

**HDFC BANK** We understand your world

**नोंदणीकृत कार्यालय :** एचडीएफसी बँक हाउस, सेनापती बापट मार्ग, लोवर परळ (पश्चिम) मुंबई -400 013 आणि त्याचे एक कार्यालय एचडीएफसी बँक लिमिटेड येथे रिटेल पोर्टफोलिओ व्यवस्थापन म्हणून आहे, पहिला मजला, I- थिंक टेक्नो कॅम्पस, कंजुमार्ग (पूर्व) मुंबई- 400042

**एचडीएफसी बँक लिमिटेडकडे तारण ठेवलेल्या सिक्युरिटीजच्या विक्रीची माहिती आणि सार्वजनिक सूचना.**

एचडीएफसी बँक लि. ("बँक") च्या खाली नमूद केलेल्या कर्जदारांना बँकेकडे तारण ठेवलेल्या सिक्युरिटीजच्या विक्रीबाबत, सिक्युरिटीज विरुद्ध कर्ज/ओव्हरड्राफ्ट या स्वरूपाच्या क्रेडिट सुविधांचा लाभ घेण्यासाठी याद्वारे सूचित केले जाते.

कर्जदारांनी मान्य केलेल्या कर्जाच्या अटींनुसार थकबाकीची परतफेड करण्यात सतत चूक केल्यामुळे, खालील कर्ज खाती बकाया स्थितीत आहेत. बँकेने या कर्जदारांना अनेक नोटिस जारी केल्या आहेत, ज्यात खाली नमूद केलेल्या तारखेला अंतिम विक्री सूचनेचा समावेश आहे, ज्याद्वारे बँकेने तारण मागवले होते आणि कर्जदाराला खालील खात्यांमधील संपूर्ण थकबाकीची परतफेड करण्यासाठी 7 दिवसांचा वेळ दिला होता, जे अयशस्वी झाले. बँकेला या संदर्भात पुढील सूचना न देता तारण ठेवलेल्या रोख्यांची विक्री करण्यास स्वातंत्र्य असेल.

कर्जदारांनी दुर्लक्ष केले आहे आणि थकीत परतफेड करण्यात अयशस्वी झाले आहे, म्हणून, बँकेने कर्ज करारांतर्गत आपल्या अधिकारांचा वापर करताना तारणधारक म्हणून **20 एप्रिल, 2024** रोजी किंवा नंतर बँकेचे कर्जदारांकडून कर्जाची थकबाकी वसूल करण्यासाठी सिक्युरिटीजची विक्री / विल्हेवाट लावण्याचा निर्णय घेतला आहे. कर्जदारांना असेही सूचित केले जाते की, जर कधीही, तारण ठेवलेल्या सिक्युरिटीजचे मूल्य शेअर बाजारातील अस्थिरतेमुळे कमी होऊन मार्जिनच्या गरजेमध्ये आणखी कमतरता निर्माण झाली तर बँक तिच्या विवेकबुद्धीनुसार तारण ठेवलेल्या सिक्युरिटीजची एक (1) कॅलेंडर दिवस, या संदर्भात कोणतीही सूचना न देता विक्री करेल. तारण ठेवलेल्या सिक्युरिटीजच्या विक्रीतून मिळालेल्या रकमेचे समायोजन केल्यानंतर, कोणत्याही उर्वरित थकबाकीच्या परतफेडीसाठी कर्जदार (चे) बँकेला जबाबदार राहतील.

| अनु. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जदाराचे नाव | 9 एप्रिल 2024 प्रमाणे थकबाकी रक्कम | विक्री सूचनेची तारीख |
|---|---|---|---|---|
| 1 | XXXX0240 | प्रद्युम्न राजाराम समुद्र | 2,86,063.35 | 12 एप्रिल 2024 |

**दिनांकित : 13.04.2024**
**ठिकाण : गोवा**

सही/-
**एचडीएफसी बँक लिमिटेड**

**ICICI Home Finance**

**कॉर्पोरेट कार्यालय :** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व,) मुंबई-400059, भारत

**शाखा कार्यालय :** सीटीएस क्र. 3414, पहिला मजला, अनंत प्लाझा, समदेवी गल्ली, खडे बाजार, बोगार्वेस सर्कल जवळ, बेळगाव - 590002

[नियम 8(6) साठी प्रोव्हिसो पहा]

**अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 8 (6) साठी प्रोव्हिसो सह वाचण्यात येणाऱ्या सेक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियली असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

या सूचनेंतर्ग सर्वसामान्य जनतेला, विशेषत: कर्जदार/हमीदारांना असे कळविण्यात येते की खाली वर्णन केलेली अचल मालमत्ता सुरक्षित धनको, आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि. यांच्याकडे तारण ठेवलेली आहे, ज्याचा सुरक्षित धनको, आयसीआयसीआय होम फायनान्सचे प्राधिकृत अधिकारी यांनी **प्रतिकात्मक ताबा** घेतलेला आहे आणि सुरक्षित धनको, आयसीआयसीआय होम फायनान्सकडून "जसे आहे जेथे आहे," "जसे आहे जे" आणि "जे आहे ते"या आधारावर या मालमत्तांची विक्री केली जाईल.

| अनु क्र. | कर्जदार/सहकर्जदार/हमीदार/ कायदेशीर वारस यांचे नाव कर्ज खाते क्र. | ज्ञात अडचणींसह (कोणत्याही असल्यास) सुरक्षित मालमत्तेचा तपशील | थकीत रक्कम | आरक्षित मूल्य / अर्नेस्ट मनी डिपॉझिट | मालमत्ता तपासणीची तारीख आणि वेळ | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| (अ) | (ब) | (क) | (ड) | (इ) | (फ) | (ज) |
| | श्री. मारिओ पावलो पॅट्रिक डिकॉस्ता (कर्जदार), माटिल्डा मारियो डिकॉस्ता (सह-कर्जदार), कर्ज खाते क्र. LHGOA00001316909 | कार्यालय क्र. सी-401, चौथा मजला, सी विंग, ओशिया कमर्शियल आर्केड, मडगाव, गोवा- 403601 | रु. 39,28,316/- एप्रिल 05, 2024 | रु. 33,68,250/- / रु. 3,36,830/- | मे 06, 2024 सकाळी 11 ते दुपारी 3 | मे 22, 2024 दुपारी 2 ते 3 |

ऑनलाइन लिलाव आमच्या लिलाव एजन्सी **ग्लोब टेकच्या** वेबसाइटवर **(URL Link-https://BestAuctionDeal.com)** केला जाईल. 21 मे 2024 संध्याकाळी 5 पर्यंत पुढील व्याजासह एकूण थकबाकी भरण्याची शेवटची संधी गहाणखतदाराला या सूचनेद्वारे दिली जाते अन्यथा या सुरक्षित मालमत्ता वरील वेळापत्रकानुसार विकल्या जातील.

संभाव्य बोलीदाराने अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी) आरटीजीएस/ डिमांड ड्राफ्ट (डीडी) (कॉलम ई पहा) माध्यमातून **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, सीटीएस क्रमांक 3414, पहिला मजला, अनंत प्लाझा, समदेवी गल्ली, खडे बाजार, बोगार्वेस सर्कल जवळ, बेळगाव - 590002** येथे **21 मे 2024** रोजी **दुपारी 4 पूर्वी** सादर करणे आवश्यक आहे. संभाव्य बोलीदारांनी नोंदणी फॉर्मची स्वाक्षरी केलेली प्रत आणि बोली अटी व शर्ती फॉर्म **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, सीटीएस क्रमांक 3414, पहिला मजला, अनंत प्लाझा, समदेवी गल्ली, खडे बाजार, बोगार्वेस सर्कल जवळ, बेळगाव - 590002** येथे **21 मे 2024** रोजी **संध्याकाळी 5** पूर्वी सादर करणे आवश्यक आहे. अर्नेस्ट मनी डिपॉझिट डिमांड ड्राफ्ट (डीडी) **गोवा** येथे देय असलेल्या **"आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि.**-लिलाव" च्या नावे राष्ट्रीयकृत / शेड्यूल्ड बँकेकडून असावा.

लिलावाची तपासणी, अटी व शर्ती किंवा निविदा सादर करण्याच्या संदर्भात पुढील कोणत्याही स्पष्टीकरणासाठी कृपया **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेडशी 9920807300** वर किंवा आमचे विक्री आणि विपणन भागीदार **नेक्सेन सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड** यांच्याशी संपर्क साधा.

कोणतीही कारणे न देता कोणतीही किंवा सर्व बोली नाकारण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्याने राखून ठेवला आहे. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि नियमांसाठी, कृपया **https://www.icicihfc.com** ला भेट द्या

**दिनांकित: 13 एप्रिल 2024**
**ठिकाण: गोवा**

**अधिकृत अधिकारी**
**आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड**

**ICICI Home Finance**

**कॉर्पोरेट कार्यालय :** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व,) मुंबई-400059, भारत

**शाखा कार्यालय :** सीटीएस क्र. 3414, पहिला मजला, अनंत प्लाझा, समदेवी गल्ली, खडे बाजार, बोगार्वेस सर्कल जवळ, बेळगाव - 590002

[नियम 8(6) साठी प्रोव्हिसो पहा]

**अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 8 (6) साठी प्रोव्हिसो सह वाचण्यात येणाऱ्या सेक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियली असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

या सूचनेंतर्ग सर्वसामान्य जनतेला, विशेषत: कर्जदार/हमीदारांना असे कळविण्यात येते की खाली वर्णन केलेली अचल मालमत्ता सुरक्षित धनको, आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि. यांच्याकडे तारण ठेवलेली आहे, ज्याचा सुरक्षित धनको, आयसीआयसीआय होम फायनान्सचे प्राधिकृत अधिकारी यांनी **भौतिक ताबा** घेतलेला आहे आणि सुरक्षित धनको, आयसीआयसीआय होम फायनान्सकडून "जसे आहे जेथे आहे," "जसे आहे जे" आणि "जे आहे ते"या आधारावर या मालमत्तांची विक्री केली जाईल.

| अनु क्र. | कर्जदार/सहकर्जदार/हमीदार/ कायदेशीर वारस यांचे नाव कर्ज खाते क्र. | ज्ञात अडचणींसह (कोणत्याही असल्यास) सुरक्षित मालमत्तेचा तपशील | थकीत रक्कम | आरक्षित मूल्य / अर्नेस्ट मनी डिपॉझिट | मालमत्ता तपासणीची तारीख आणि वेळ | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| (अ) | (ब) | (क) | (ड) | (इ) | (फ) | (ज) |
| | विजय सक्सेना (कर्जदार) रुचिन चंद्रेश्वर दयाळ (हमीदार) कर्ज खाते क्र. LHGOA00000740309 | फ्लॅट क्र. एफएफ4 ची ती सर्व मालमत्ता, चौथ्या मजल्यावर स्थित, वास्को सिटी सेंटर इमारतीचे नाव, उम टेरेनो सेम डिनोमिन अकाओ स्पेशल नावाच्या मालमत्तेवर बांधलेले, वास्को द गामा येथे स्थित, जमीन नोंदणी कार्यालयात नवीन सिरीजच्या क्र. 25, 387 अंतर्गत तालुका वर्णन करण्यात आला आहे, तालुका महसूल अंतर्गत नोंदणीकृत, मॅट्रिझ क्र. 103 आणि पी.टी.शीट क्र. 102 च्या सर्व्हे क्र. 2 आणि 3 अंतर्गत सर्व्हेक्षित आणि उपजिल्हा मुरगाव, जिल्हा दक्षिण गोवा, गोवा राज्य. | रु. 44,85,754/- एप्रिल 08, 2024 | रु. 45,33,165/- / रु. 4,53,320/- | मे 06, 2024 सकाळी 11 ते दुपारी 3 | मे 22, 2024 दुपारी 2 ते 3 |

ऑनलाइन लिलाव आमच्या लिलाव एजन्सी **ग्लोब टेकच्या** वेबसाइटवर **(URL Link-https://BestAuctionDeal.com)** केला जाईल. 21 मे 2024 संध्याकाळी 5 पर्यंत पुढील व्याजासह एकूण थकबाकी भरण्याची शेवटची संधी गहाणखतदाराला या सूचनेद्वारे दिली जाते अन्यथा या सुरक्षित मालमत्ता वरील वेळापत्रकानुसार विकल्या जातील.

संभाव्य बोलीदाराने अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी) आरटीजीएस/ डिमांड ड्राफ्ट (डीडी) (कॉलम ई पहा) माध्यमातून **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, सीटीएस क्रमांक 3414, पहिला मजला, अनंत प्लाझा, समदेवी गल्ली, खडे बाजार, बोगार्वेस सर्कल जवळ, बेळगाव - 590002** येथे **21 मे 2024** रोजी **दुपारी 4 पूर्वी** सादर करणे आवश्यक आहे. संभाव्य बोलीदारांनी नोंदणी फॉर्मची स्वाक्षरी केलेली प्रत आणि बोली अटी व शर्ती फॉर्म **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, सीटीएस क्रमांक 3414, पहिला मजला, अनंत प्लाझा, समदेवी गल्ली, खडे बाजार, बोगार्वेस सर्कल जवळ, बेळगाव - 590002** येथे **21 मे 2024** रोजी **संध्याकाळी 5** पूर्वी सादर करणे आवश्यक आहे. अर्नेस्ट मनी डिपॉझिट डिमांड ड्राफ्ट (डीडी) **गोवा** येथे देय असलेल्या **"आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि.**-लिलाव" च्या नावे राष्ट्रीयकृत / शेड्यूल्ड बँकेकडून असावा.

लिलावाची तपासणी, अटी व शर्ती किंवा निविदा सादर करण्याच्या संदर्भात पुढील कोणत्याही स्पष्टीकरणासाठी कृपया **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेडशी 9920807300** वर किंवा आमचे विक्री आणि विपणन भागीदार **नेक्सेन सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड** यांच्याशी संपर्क साधा.

कोणतीही कारणे न देता कोणतीही किंवा सर्व बोली नाकारण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्याने राखून ठेवला आहे. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि नियमांसाठी, कृपया **https://www.icicihfc.com** ला भेट द्या

**दिनांकित: 13 एप्रिल 2024**
**ठिकाण: गोवा**

**अधिकृत अधिकारी**
**आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड**

**मुद्रक व प्रकाशक** सागर लादे यांनी प्रुडंट मीडिया (गोवा) प्रा. लि. यांच्यातर्फे हे पत्र एलिगंट ऑफसेट, थिवी औद्योगिक वसाहत करासवाडा म्हापसा येथे **मुद्रित** करुन दुसरा मजला, फोर्थ इस्टेट (कामत मेट्रोपॉलीस) सांत इनेज, पणजी, गोवा. येथे **प्रकाशित** केले.

**संपादक : पांडुरंग गांवकर** (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी) सर्व हक्क सुरक्षित.
**संपादकीय कार्यालय :** दुसरा मजला, फोर्थ इस्टेट (कामत मेट्रोपॉलीस) सांत इनेज, पणजी, गोवा. **वृत्तविभाग :** ०८३२-२४०५९५०, **फॅक्स :** ०८३२-२४०५९५२, **ईमेल :**news.varta@thegoan.net, goanvarta@gmail.com **सावंतवाडी कार्यालय :** कोकणसाद लाईव्ह, हरिप्रिया अपार्टमेंट, एस.टी. बसस्थानकानजीक, मेन रोड, सावंतवाडी. **संपर्क :** ०२३६३२७२१९१, ९९२२९२८०८१

**सूचना :** संपादकीय वगळता सर्व स्तंभ, वाचकांची पत्रे, लेख ही त्या त्या लेखकांची मते आहेत. दै. गोवन वार्ताचे संपादक, प्रकाशक आणि मालक यांची नव्हे. **वितरण चौकशी :** (०८३२) २४९०४०४, **ईमेल :** circulation@thegoan.net **जाहिरातविषयक चौकशी :** (०८३२) २४०५९८८ **ईमेल :** advertising@thegoan.net

epaper : thegoan.net